# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## विभाग : विधी विभाग

Scanned with OKEN Scanner

# जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव

महात्मा गांधी रोड,नेहरु चौक,जळगाव-४२५००१ फोन (०२५७)२२२२२६१,६२,६३,६४,६५

MUNCIPAL CORPORATION OF THE CITY JALGAON

Mahatma Gandhi Road! Neharu Chauk! Jalgaon-425001


संदर्भ क्रं./ज.श.म.न.पा/ विधी विभाग /९८/२०२६-२७ दि.: ०८/ ०६ /२०२६

प्रति.

मा. कार्यालय अधीक्षक,

प्रमुख कार्यालय.

जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव.

**विषय** :- जळगाव शहर महानगरपालिकेतील प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत विधी विभागामार्फत घेण्यात आलेले निर्णय, मंजूर कामे, आर्थिक व्यवहार व प्रशासकीय कारभाराबाबत श्वेतपत्रिकेसाठी माहिती सादर करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, जळगाव शहर महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत विधी विभागामार्फत महानगरपालिकेची बाजू विविध न्यायालये, न्यायाधिकरणे व प्राधिकरणांपुढे प्रभावीपणे मांडण्यासाठी विधीज्ञ पॅनल व प्रमुख विधी सल्लागार यांची नियुक्ती, मुदतवाढ तसेच न्यायालयीन कामकाजाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रशासकीय निर्णय घेण्यात आलेले होते. सदर कालावधीत घेण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**विधी विभागामार्फत प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत घेण्यात आलेले महत्त्वपूर्ण निर्णय**

| अ.क्र. | ठराव क्रमांक व दिनांक | निर्णयाचे स्वरूप | प्रमुख बाबी / परिणाम |
|---|---|---|---|
| १ | प्रशासक ठराव क्र. १४१ दि. १२/०९/२०२४ | कार्यरत विधीज्ञ पॅनल व प्रमुख विधी सल्लागार यांना ०१ वर्ष मुदतवाढ देण्यास मान्यता. | स्थायी समिती ठराव क्र. ३४७ दि. २९/०७/२०१९ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या ४६ विधीज्ञांच्या पॅनलची व प्रमुख विधी सल्लागारांची मुदत दि. ०६/०९/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याने महानगरपालिकेच्या न्यायालयीन कामकाजात सातत्य राहण्यासाठी विद्यमान विधीज्ञ पॅनल व प्रमुख विधी सल्लागार यांना विद्यमान अटी व मानधनावर एक वर्ष मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच आवश्यकतेनुसार नव्याने विधीज्ञांची नियुक्ती करण्यासाठी नियमानुसार जाहिरात प्रसिद्ध करून कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले होते. |
| २ | प्रशासक ठराव क्र. ३०७ दि. १६/०९/२०२५ | कार्यरत विधीज्ञ पॅनलला मुदतवाढ देण्यास मान्यता. | महानगरपालिका निवडणूक प्रक्रिया सुरू असल्याने नव्या पॅनलची नियुक्ती तत्काळ करणे शक्य नसल्यामुळे त्यावेळे विविध न्यायालयात कार्यरत ४६ विधीज्ञांना न्यायालयीन प्रकरणांतील सातत्य अबाधित ठेवण्यासाठी एक वर्ष (दि.०६/०९/२०२५ पर्यंत) मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. |
| ३ | प्रशासक ठराव क्र. ३१२ दि. १०/१०/२०२५ | प्रमुख विधी सल्लागार पदास मुदतवाढ देण्यास मान्यता. | प्रमुख विधी सल्लागार अॅड. आनंद एस. मुजुमदार यांचा कार्यकाळ दि.०६/०९/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्याने तसेच त्यांनी पूर्वीप्रमाणेच मानधनावर काम करण्याची तयारी दर्शविल्याने त्यांना प्रमुख विधी सल्लागार पदावर एक वर्ष मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. |

उपरोक्तप्रमाणे प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत विधी विभागामार्फत घेण्यात आलेले निर्णय हे मुख्यतः विविध न्यायालयामध्ये महानगरपालिकेची बाजू मांडणेकामी नियुक्त करण्यात आलेल्या विधीज्ञ व प्रमुख विधी सल्लगार यांना मुदत वाढ देणेकामी घेण्यात आलेले आहेत.

गौरव सपकाळे

प्र.विधी अधिकारी विधी विभाग

जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव

Scanned with OKEN Scanner

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक, जळगाव - ४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax : 2222260


**(स्थायी समिती)**

**सभा क्र.२८**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:-१४१** **दिनांक :-१२/०९/२०२४**

वाचा :-

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. विधीशाखा प्रमुख, विधी विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./विधी विभाग/४६/२०२४-२५ दि.०४/०९/२०२४
३. सहाय्यक आयुक्त (विधी) यांचा दि.२९/०८/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त (विधी) यांचा दि.२९/०८/२०२४ चा अभिप्राय
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.३०/०८/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.जिल्हा न्यायालय, मा.औदयोगिक न्यायालय, मा.कामगार न्यायालयात महानगरपालिकेची बाजू प्रभावीपणे मांडणे करीता प्रमुख विधी सल्लागार व वकील पॅनल नियुक्त करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व विधीशाखा प्रमुख, विधी विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव विरुध्द मा.जिल्हा व सत्र न्यायालय, मा.औदयोगिक न्यायालय, मा.कामगार न्यायालय, मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ, मा.उच्च न्यायालय मुंबई, मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल दावे / पिटीशन मध्ये महानगरपालिकेची बाजु प्रभावीपणे मांडणे करीता मा.स्थायी समिती ठराव क्र.१४७ दि.२९/०७/२०१९ अन्वये दि.०६/०९/२०१९ पासुन पाच वर्षाकरीता वकिल पॅनल नियुक्त करणेत आलेले होते. त्यानुसार मे.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली करीता ३, मे.उच्च न्यायालय खडपीठ औरंगाबाद करीता ०७, मे.जिल्हा व सत्र न्यायालय जळगांव करीता ३६, असे एकुण ४६ वकिलांची नियुक्ती सदर पॅनल मध्ये करण्यात आलेली होती. सदर पॅनल मधुन अॅड आनंद एस मुजुमदार यांची प्रमुख विधी सल्लागार म्हणुन पाच वर्षाकरीता नियुक्ती करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने स्थायी समिती ठराव क्र.१४७ दि.२९/०७/२०१९ अन्वये गठीत वकिल पॅनलची मुदत दि.०६/०९/२०१९ ते दि.०६/०९/२०२४ अशी पाच वर्षाकरीता होती.

सदर वकिल पॅनलची मुदत दि.०६/०९/२०२४ रोजी समाप्त होत असल्याने कार्यरत असलेले विधीज्ञ अॅड.केतन जयदेव ढाके,जळगांव यांनी दि.२१/०८/२०२४ रोजी दिलेला अर्ज विधी विभागात दि.२३/०८/२०२४ रोजी प्राप्त झाला असुन त्यांनी मुख्य विधी सल्लागार पदी नेमणुक करणेबाबत पत्रात नमुद केलेले आहे.

तसेच अॅड आनंद एस. मुजुमदार जळगांव यांनी दि.२२/०८/२०२४ रोजी दिलेला अर्ज विधी विभागात दि.२७/०८/२०२४ रोजी प्राप्त झाला असुन त्यांनी प्रमुख विधी सल्लागार या पदाचा त्यांचा कार्यकाळ दि.०६/०९/२०२४ रोजी समाप्त होत असल्याने पुन: प्रमुख विधी सल्लागार पदी नेमणूक होणेस व मानधन रक्कमच्या रक्कमेत वाढ करुन रक्कम रु.५०,०००/- मिळणेबाबत अर्जात नमुद केले आहे.



Scanned with OKEN Scanner

तरी कार्यरत विधीज्ञ व प्रमुख विधी सल्लागार यांना मुदत वाढ देणे अगर नवीन प्रमुख विधी सल्लागार नेमणे, नविन पॅनल नियुक्ती करणे कामी मान्यता मिळण्यासाठी विधीशाखा प्रमुख, विधी विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्ताव व वाचा क्र.१ ते ५ नूसार स्थायी समिती ठराव क्र.१४७ दि.२९/०७/२०१९ अन्वये दि.०६/०९/२०१९ पासून पाच वर्षाकरीता नियुक्त करण्यात आलेले आहे. त्याची मुदत दि.०६/०९/२०२४ रोजी संपत असल्याने सदर ठरावानूसार नियुक्त केलेल्या वकील पॅनल मधिल सर्व विधीज्ञ व प्रमुख विधी सल्लागार यांना एक वर्षासाठी उपरोक्त ठरावानूसार निश्चित केलेल्या फी व मानधनाप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

विधीज्ञ यांच्या संख्येत वाढ करावयाची झाल्यास त्यासाठी नियमाप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून विहीत कार्यपध्दतीनूसार विधी विभागाने कार्यवाही करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

(ज्ञानेश्वर ढेरे)
प्रशासक
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

JALGAON CITY MUNICIPAL CORPORATION •JALGAON•
जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax-2222260


**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-१०** **प्रशासक ठराव क्र.:-३०७** **दिनांक :-१६/०९/२०२५**

वाचा :-

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. विधी शाखा प्रमुख, विधी विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./जमनपा/विधी शाखा/७०/२०२५ दि.१६/०९/२०२५
३. विधी शाखा प्रमुख, विधी विभाग यांचा दि.०३/०९/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०२/०९/२०२५ चा अभिप्राय.
५. उपायुक्त यांचा दि.०८/०९/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.१०/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय** :- जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे मा.सर्वोच्च् न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.जिल्हा न्यायालय,मा.औद्योगिक न्यायालय,मा.कामगार न्यायालयात महानगरपालिकेची बाजू प्रभावीपणे मांडणेकरीता कार्यरत विधीज्ञ पॅनलला मुदतवाढ देणेकामी मान्यता मिळणेबाबत .

---

वाचा क्र.१ व विधी शाखा प्रमुख, विधी विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

ज.श.म.न.पा. विधीज्ञ पॅनलची नियुक्ती म.स्थायी समिती ठराव क्र.१४७, दि.२९/०७/२०१९ अन्वये दि.०६/०९/२०१९ पासून पाच वर्षाकरिता करण्यात आलेली होती. त्यात वेळोवेळी मुदतवाढ देत सन-२०२४ मध्ये एक वर्षाकरिता दिलेल्या मुदतवाढीत विधीज्ञ पॅनल वरील नियुक्त ४६ विधीज्ञांपैकी १९ विधीज्ञांनी पॅनलवर काम करण्याकरिता करारनामा करुन दिलेला होता. तसेच दि.०६/०९/२०२४ ते दि.०६/०९/२०२५ या एक वर्षाच्या मुदतबाढ दिलेल्या कालावधीत १९ विधीज्ञ कार्यरत होते. आजमितीस जिल्हा सत्र न्यायालय, उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ, सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे अनुक्रमे दहा , सात , दोन असे एकूण एकोणावीस विधीज्ञ कामकाज पाहत आहे.

तसेच उक्त नमुद प्रमाणे विधीज्ञ पॅनल वरील नियुक्त करण्यात आलेले ४६ विधीज्ञ खालील प्रमाणे असे.

| | | |
|---|---|---|
| | मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली | |
| १ | अॅड. सुहास कदम | दिल्ली |
| २ | अॅड. प्रशांत एस. केंजाळे | दिल्ली |
| ३ | अॅड. शिवाजी जाधव | दिल्ली |
| | मा.उच्च न्यायालय खंडपीठ , औरंगाबाद | |
| १ | (अॅड. सुशीलकुमार हेमंतकुमार त्रिपाठी)<br>अॅड [illegible]ायमा | औरंगाबाद |
| २ | (अॅड. विजय. बी. पाटील) ·<br>अॅड . श्रीकांत पाटील | औरंगाबाद |
| ३ | अॅड. संदेश. आर. पाटील | औरंगाबाद |
| ४ | अॅड. सचिन बाळासाहेब मुंडे | औरंगाबाद |
| ५ | अॅड. व्ही. डी. गुनाले | औरंगाबाद |
| ६ | अॅड. लक्ष्मण विष्णु संगीत | औरंगाबाद |
| ७ | अॅड. मेहुल नावंदर | औरंगाबाद |
| | मा.जिल्हा व सत्र न्यायालय , जळगांव | |
| १ | अॅड. आनंद. एस. मुजुमदार | जळगांव |
| २ | अॅड. गजेंद्र यशवंतराव पाटील | जळगांव |
| ३ | अॅड. विक्रम उत्तम देवराज | जळगांव |
| ४ | अॅड. सुरेंद्र . जी. काबरा | जळगांव |
| ५ | अॅड. छाया . आर. सपके | जळगांव |

| | | |
|---|---|---|
| ६ | अॅड. धिरज अशोक पाटील | जळगांव |
| ७ | अॅड. दिपकराज सोपान खडके | जळगांव |
| ८ | अॅड. व्ही. एम. पाटील | जळगांव |
| ९ | अॅड. जयंत तुळशीदास कुरकुरे | जळगांव |
| १० | अॅड. सतिश रघुनाथ चव्हाण | जळगांव |
| ११ | अॅड. महेश रघुनाथ भोकरीकर | जळगांव |
| १२ | अॅड. तुळशीराम पंडीत नमाडे | जळगांव |
| १३ | अॅड. दर्शन बी. देशमुख | जळगांव |
| १४ | अॅड. स्वप्निल विजयसिंग पाटील | जळगांव |
| १५ | अॅड.टी.आर. पाटील | जळगांव |
| १६ | अॅड. ज्योती सुनील भोळे | जळगांव |
| १७ | अॅड. सुनील रघुनाथ बागुल | जळगांव |
| १८ | अॅड. अमित एस. सोनवणे | जळगांव |
| १९ | अॅड. प्रदीप शांताराम सोपारकर | जळगांव |
| २० | अॅड. मिलींद पंढरीनाथ बडगुजर | जळगांव |
| २१ | अॅड. वसंत समाधान भोलाणकर | जळगांव |
| २२ | अॅड. केतन जयदेव ढाके | जळगांव |
| २३ | अॅड. रणजितसिंग के. पाटील | जळगांव |
| २४ | अॅड. सुभाष रामदास तायडे | जळगांव |
| २५ | अॅड. दिलीपकुमार भगवानदास मंडोरे | जळगांव |
| २६ | अॅड. रमाकांत सोनवणे | जळगांव |
| २७ | अॅड. विलास मानसिंग पाटील | जळगांव |
| २८ | अॅड. अनिल सुर्याजी पाटील | जळगांव |
| २९ | अॅड. राजेंद्र काशिनाथ पन्हाळे | जळगांव |
| ३० | अॅड. आनंदा रामकृष्ण सरोदे | जळगांव |
| ३१ | अॅड. सारंग कुलकर्णी | जळगांव |
| ३२ | अॅड. जयंत भाऊराव मोरे | जळगांव |
| ३३ | अॅड. विजय एस. शिंदे | जळगांव |
| ३४ | अॅड. अशोक जगन्नाथ महाजन | जळगांव |
| ३५ | अॅड. स्वप्नील एस. कुलकर्णी | जळगांव |
| ३६ | अॅड. नरेंद्र पुंजु पाटील | जळगांव |

उक्त नमुद तक्त्यातील मा.उच्च न्यायालय , खंडपीठ औरंगाबाद येथील विधीज्ञ अॅड . सुशिलकुमार त्रिपाठी व अॅड. विजय बी. पाटील यांचे जागी अनुक्रमे अॅड. राजेंद्र दायमा व अॅड . श्रीकांत पाटील यांची नव्याने नेमणुक करण्यात आलेली आहे.

उपरोक्त विधीज्ञ तसेच प्रमुख विधी सल्लागार यांची मुदत दि.०६/०९/२०२५ रोजी संपुष्टात येत आहे. सद्यस्थितीत जळगांव शहर महानगरपालिका निवडणूक २०२५ ची प्रक्रीया सुरु झालेली आहे. अशा परिस्थितीत नविन विधीज्ञ पॅनल व प्रमुख विधी सल्लागार यांची विहीत कार्यपध्दतीने नियुक्ती देणेस विलंब होणार असल्याने आणि आयुक्त तथा प्रशासक यांनी त्यांचेसोबत झालेल्या बैठकीत दिलेल्या सुचनेनुसार ज्या विधीज्ञांकडे विविध दावे / पिटीशन सुरु आहेत व त्यांच्याकडील काही दाव्यात निकाल लागलेला असून काही न्यायप्रविष्ट असल्याने उक्त नमुद यादीतील विधीज्ञ व प्रमुख विधी सल्लागार यांना विहीत कार्यपध्दती नुसार प्रक्रीया पुर्ण होईपावेतो १ वर्षा करीता मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तसेच एखादया विशिष्ट दावा / पिटीशन मध्ये सिनीयर / स्पेशल कोन्सील नेमण्याची आवश्यकता भासल्यास नेमणूकीचे अधिकार आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता मिळण्यासाठी विधी शाखा प्रमुख, विधी विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावात नमुद यादीतील विधीज्ञ यांना विहीत कार्यपध्दती नुसार प्रक्रीया पुर्ण होईपावेतो १ वर्षा करीता मुदतवाढ देणेस तसेच प्रमुख विधी सल्लागार यांना यापूर्वी किती मानधन दिले जात होते यासह प्रमुख विधी सल्लागार यांची नियुक्ती करणेकामी प्रस्ताव फेर सादर करणेस वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५.२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

JALGAON CITY MUNICIPAL CORPORATION JALGAON

(ज्ञानेश्वर ढेरे)
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

Scanned with OKEN Scanner

प्रशासक कार्यकाळ\सभा कामकाज\स्थायी समिती ठराव/सभा क्र 54 - 10102025

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63 64,65 Fax – 2222260

**सभा क्र.५४** **(स्थायी समिती)**

---

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:-३१२** **दिनांक :- १०/१०/२०२५**

वाचा :-

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. विधी शाखा प्रमुख यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./जमनपा/ विधी शाखा/८२/२०२५ दि. ०८/१०/२०२५
३. विधी शाखा प्रमुख यांचा दि.२३/०९/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.२४/०९/२०२५ चा अभिप्राय.
५. आयुक्त यांचा दि.२४/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय** :- जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.जिल्हा न्यायालय,मा.औद्योगिक न्यायालय,मा.कामगार न्यायालयात महानगरपालिकेची बाजू प्रभावीपणे मांडणेकरीता कार्यरत प्रमुख विधी सल्लागार यांना मुदतवाढ देणे अगर नव्याने प्रमुख विधी सल्लागार यांची नियुक्ती करणे बाबत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत .

---

वाचा क्र.१ व विधी शाखा प्रमुख यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका प्रमुख विधी सल्लागार पदाची दि.०६/०९/२०२५ रोजी मुदत संपुष्टात येत असलेल्या प्रमुख विधी सल्लागार पदाची मुदतवाढ वाढवून व मानधन रु.२५,०००/- वरून रु.५०,०००/-वाढवून मिळावे म्हणून प्रमुख विधी सल्लागार अॅड. आनंद मुजूमदार यांनी दि.०८/०८/२०२५ रोजीचा अर्ज दिलेला आहे.

प्रमुख विधी सल्लागार पदी नियुक्ती मिळावी करीता अॅड.केतन ढाके यांनी दि.३१/०७/२०२५ रोजी अर्ज दिलेला असून अर्जात नमूद प्रमाणे महानगरपालिका तर्फे देण्यात येणारे मानधन व अटी मला मान्य राहतील असे कळविलेले आहे.

प्रमुख विधी सल्लागार पदी मुदतवाढ देणे किंवा नव्याने नियुक्ती करणे करीता प्रस्ताव सादर केला असता आयुक्त यांनी सद्या कार्यरत असलेले अॅड.आनंद मुजुमदार यांना मुदतवाढ द्यावयाची असल्यास त्यांनी पुर्ववत मानधनावर काम करण्याची तयारी दर्शविल्यास त्याचा विचार करता येईल अॅड . मुजुमदार यांनी संमती दर्शवली नसल्यास अॅड . केतन ढाके यांना नियुक्ती देणेकामी विचार होईल करीता अॅड.आनंद मुजुमदार यांना कळविण्यात यावे त्या अनुषंगाने विधी विभागाकडील जा.क्रं.विधी/७३/२०२५ दि. १७/०९/२०२५ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने अॅड.आनंद मुजुमदार, जळगांव यांचेकडील दि.१९/०९/२०२५ रोजीचे पत्र विधी विभागाकडेस प्राप्त झालेले असून सदर पत्रात त्यांनी यापुर्वी त्यांना मिळत असलेले मानधन रक्कम रू.२५,०००/- मात्र वर प्रमुख विधी सल्लागार म्हणून कामकाज करण्यास तयार असलेबाबत तयारी दर्शविलेली आहे. तसेच प्रमुख विधी सल्लागार म्हणून मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी कार्यरत प्रमुख विधी सल्लागार यांना मुदतवाढ देणे अगर नव्याने प्रमुख विधी सल्लागार यांची नियुक्ती करणेकामी मान्यता मिळण्यासाठी विधी शाखा प्रमुख यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेनूसार सदया कार्यरत असलेले प्रमुख विधी सल्लागार, अॅड.आनंद मुजुमदार,जळगांव यांना १ (एक) वर्ष मुदतवाढ देणेस वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

(ज्ञानेश्वर ढेरे)
प्रशासक
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

Scanned with OKEN Scanner